


हिंदवी स्वराज्याचे संस्थापक
छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती.

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

धुळे | वर्ष २८ । अंक १२१ । बुधवार, दि.१९ फेब्रुवारी २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | दे मोबाईल आवृत्ती वाचा व वर




## तुझ्या मनात कचरा भरलाय : रणवीर अलाहाबादियाला ‘सर्वोच्च फटकार’!

**नवी दिल्ली ।** पॉडकास्टर रणवीर अलाहाबादियावर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. रणवीर अलाहाबादियाने केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणीविरोधात महाराष्ट्र आणि आसामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याविरोधात त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर सुनावणी सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने त्याच्यावर ताशेरे ओढले आहेत. न्यायालयाने म्हटले आहे की, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली, समाजाच्या नियमांविरोधात बोलण्याचा कोणालाही परवाना मिळालेला नाही. ही अश्लीलता नाही तर ते काय आहे? आम्ही तुमच्याविरुद्धचे एफआयआर रद्द का करावेत किंवा क्लब का करावेत? असा प्रश्नही सर्वोच्च न्यायालयाने विचारला आहे. रणवीर अलाहाबादियाला सर्वोच्च न्यायालयाने अटकेपासून अंतरिम दिलासा दिला आहे. न्यायालयाने अलाहाबादियाच्या टिप्पण्यांचा निषेध करत म्हटले की, या व्यक्तीच्या मनात कचरा भरला आहे. तुझे शब्द पालकांना आणि बहिणींना लाज वाटतील असेच आहेत. संपूर्ण समाजाला याची लाज वाटेल. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांनी अलाहाबादियाचा पासपोर्ट ठाणे पोलिस स्टेशनमध्ये जमा करण्याचे निर्देश दिले आणि म्हटले की ते न्यायालयाच्या पूर्व परवानगीशिवाय भारत सोडणार नाहीत.



## संपादकीय

### कुंभमेळा तयारी फक्त बैठकांच्या पातळीवर?

प्रयागराज येथे सुरु असलेल्या महाकुंभमेळयाचे आकर्षण वाढतच आहे. दुर्दैवी घटना घडूनही गर्दी अजिबात कमी होताना आढळत नाही. २६ फेब्रुवारी रोजी महाकुंभमेळ्याची समाप्ती होईल. तथापि गर्दीचा रेटा लक्षात घेऊन प्रयागराज रेल्वेस्थानक २६ तारखेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने जाहीर केल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. कुंभमेळ्यासारख्या उत्सवांचे आकर्षण वाढतच जाईल असा अंदाज प्रयागराजवरून बांधला जाऊ शकेल. आगामी कुंभमेळा २०२७ मध्ये नाशिकमध्ये भरणार आहे. म्हणजे त्याच्या सर्वांगीण तयारीसाठी प्रशासनाकडे जेमतेम दोन वर्षे बाकी आहेत. मुख्यमंत्र्यांनी अनेक सूचना केल्याचे सांगितले जाते. सिंहस्थ कुंभमेळ्यात देशभरातील धार्मिक परंपरेचे दर्शन घडावे यासाठी मोठे महाकुंभ तयार करावे. त्यात देशातील तसेच राज्यातील पान २ वर

## महाकुंभ मेळाव्यावर ममता बॅनर्जी यांचे वादग्रस्त विधान



**कोलकाता ।** उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये महाकुंभमेळा सुरु आहे. या महाकुंभमेळ्याबाबत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी वादग्रस्त विधान केले आहे. ममता बॅनर्जी यांनी विधानसभेत भाषण करताना म्हटले की, महाकुंभ आता मृत्युकुंभात बदलला आहे. महाकुंभाच्या आयोजनासाठी योग्य नियोजन करण्यात आले नाही. तसेच, व्हीआयपी लोकांना विशेष सुविधा देण्यात आल्या, असेही ममता बॅनर्जी म्हणाल्या. पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. ममता बॅनर्जी या २०११ पासून सतत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आहेत. ममता बॅनर्जी यांच्या सरकारला सत्तेवरून हटवण्यासाठी भाजप सतत प्रयत्न करत आहे.

## बैठकीपूर्वी कॅबिनेटचा अजेंडा बाहेर

# मुख्यमंत्री संतापले!



**मुंबई ।** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी आपल्याच मंत्र्यांवर संतापले. मंत्रिमंडळ बैठक होण्यापूर्वी बैठकीचा अजेंडा बाहेर येत असल्यामुळे मुख्यमंत्री नाराज झाले. त्यांनी या बाबत आपल्या सहकारी मंत्र्यांना जाहीरपणे कानपिचक्या दिल्या. मुख्यमंत्री येथेच थांबले नाही त्यांनी गुप्ततेच्या शपथेची आठवणही मंत्र्यांना करुन दिली. त्यानंतरही हा प्रकार थांबला नाही तर कारवाई करण्याचा इशारा फडणवीस यांनी दिला.

माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मंत्रिमंडळ बैठक होण्याचा अजेंडा छापणे चुकीचे आहे. बैठक होण्यापूर्वी काही लोक अजेंडा छापत आहे. याबाबत मी मंत्र्यांनाही सांगितले आहे. मंत्र्यांनी आपल्या कार्यालयांना बैठकीपूर्वी अजेंडा न छापण्याचे सांगितले पाहिजे. अन्यथा मला कारवाई करावी लागेल. हा अजेंडा गुप्त असतो. त्या गुप्ततेची शपथ आपण घेतली आहे.याची आठवण देखील त्यांनी करुन दिला.

### कोल्ड वॉर नव्हे विकास विरोधी वॉर-एकनाथ शिंदे

सरकारमध्ये कोल्ड वॉर नव्हे तर महाराष्ट्र विकास विरोधी लोकांशी वॉर आहे असा खोचक टोला एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना लगावला. ते म्हणाले की, सत्तेच्या खुर्चीसाठी २०१९ मध्येच त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांना डॅमेज केले. हिंदुत्वाला डॅमेज केले. शिवसेनेला पान २ वर

## ज्ञानेश कुमार बनले नवे मुख्य निवडणूक आयुक्त

### डॉ.विवेक जोशी निवडणूक आयुक्त

**नवी दिल्ली ।** देशाच्या नव्या निवडणूक आयुक्तांच्या नावाची घोषणा झाली आहे. ज्ञानेश कुमार देशाचे नवे निवडणूक आयुक्त असतील. ते राजीव कुमार यांची जागा घेतील. राजीव कुमार आज १८ फेब्रुवारीला रिटायर झाले आहेत. उद्या ज्ञानेश कुमार पद संभाळतील. या संबंधी अधिसूनचा जारी करण्यात आली आहे. राष्ट्रपतींनी मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केली आहे ज्ञानेश कुमार यांच्याजागी आता डॉ. विवेक जोशी निवडणूक आयुक्त असतील. ज्ञानेश कुमार १९८८ बॅच केरळ केडरचे अधिकारी आहेत. मागच्यावर्षी मार्च



पासून ते निवडणूक आयुक्ताच्या पदावर आहेत. ज्ञानेश कुमार यांची मुख्य निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती करण्यात येत असल्याची अधिसूचना काढण्यात आली आहे.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी नव्या निवडणूक आयुक्तांच्या निवडीवर समाधानी नाहीत. पान २ वर

## कोठलीचा जवान उधमपूरमध्ये शहीद

**भडगाव ।** तालुक्यातील कोठली येथील भूमिपुत्र प्रवीण अभिमन्यू पाटील (वय ३०) हा सीआरपीएफ १३७ बटालीयनचा जवान उधमपूर येथे देशसेवा बजावताना शहीद झाल्याची माहिती दि.१८ रोजी दुपारी ३ वाजता गावात समजताच संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.



प्रवीण पाटील

प्रवीण पाटील हे बटालियन उधमपूर येथे कार्यरत असताना गोळी लागलेल्या परिस्थितीत त्यांना विरमरण आले आहे. सुमारे १२ वर्षांपासून ते देशसेवेत कार्यरत होते.त्यांचा स्वभाव अतिशय सोज्वळ होता. गेल्या आठवड्यात कोठली येथे आई, वडिल तसेच नातेवाईक व मित्र परिवार यांना भेटून ते कर्तव्यावर परतले होते. त्यातच अचानक शहीद झाल्याचे वृत्त आल्याने सर्वत्र शोकाकळा पसरलेली आहे. प्रवीण पाटील यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, वहिनी, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

त्यांचे पार्थिव आण्यासाठी गावातील नातेवाईक रवाना झाले आहेत. मात्र पुढील माहिती पोलीस प्रशासनाकडे विचारली असता पोलीस पाटील अतुल पाटील यांनी या घटनेची माहिती पोलीस स्टेशनला कळविलेली आहे. मात्र घटनेची अधिकृत माहिती प्रशासनाकडून कळू नाही.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1925 |
| नवती (२) | : 1725 |

### मिरकीली




## सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना



**मुंबई ।** केंद्र आणि राज्य सरकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वित्तीय समतोल ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या सहाव्या राज्य वित्त आयोग स्थापन करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. हा आयोग १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी शिफारशी करेल. या शिफारशींबाबत अहवाल सादर करण्यास या आयोगाला ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदत असेल. पाचव्या राज्य वित्त आयोगाची मुदत मार्च २०२४ मध्ये संपली होती. आता तब्बल वर्षभरानंतर सहावा राज्य वित्त आयोग गठीत केला जाणार आहे. या आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या नावाची राज्यपालांकडे शिफारस करण्याचे अधिकार मुख्यमंत्र्यांना देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. आयोगाच्या सदस्य सचिव पदावर भारतीय प्रशासन सेवेतील कनिष्ठ प्रशासकीय श्रेणीच्या अधिकारीच्या श्रेणीपेक्षा कमी नसेल किंवा समतुल्य दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल. आयोगाच्या कालावधीत आवश्यक पद निर्मिती करण्यास, आयोगाचे कामकाज अधिक परिणामकारकरीत्या चालण्यासाठी आवश्यक कार्यालय आणि आवर्ती-अनावर्ती खर्चासाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करण्याचे मंत्रिमंडळाने मान्य केले.




## गुड्ड्या खून प्रकरणातील पंच, साक्षीदारांची उलट तपासणी

**धुळे ।** धुळे शहराला हादरवणाऱ्या गुड्ड्या उर्फ रफियोद्दीन शफीयोद्दीन शेख यांच्या खून प्रकरणातील सुनावणी सध्या जिल्हा न्यायालयात सुरू असून, आज या खटल्यातील महत्त्वाच्या पंच साक्षीदारांची उलटतपासणी करण्यात आली. तब्बल दोन तास उलटतपासणी झाल्यानंतरही साक्ष अद्याप पूर्ण झाली नसल्याने पुढील सुनावणी २४ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे.

शहरातील पारोळा रोडवरील गोपाल टी हाऊससमोर दि.१८ जुलै २०१७ रोजी सकाळी सव्वासहा वाजेच्या सुमारास गुड्ड्या शेख यांची हत्या करण्यात आली होती. राजेंद्र उर्फ भद्रा, विलास गोयर, विक्रम गोयर यांच्यासह एकूण १९ जणांनी पूर्ववैमनस्यातून कट रचत तलवारी, कोयते, लोखंडी रॉड आणि बंदुकीचा वापर करून गुड्ड्यावर हल्ला चढवला होता. हल्ल्यापूर्वी त्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकण्यात आली, त्यानंतर गोळी झाडण्यात आली आणि तब्बल ४० ते ४५ वार करून जागेवरच ठार करण्यात आले. या धक्कादायक घटनेने संपूर्ण धुळे शहर हादरून गेले होते. या प्रकरणाचा तपास झाल्यानंतर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (मोक्का) न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. दरम्यान या खटल्याचे कामकाज नुकतेच सुरू झाले असून सरकारी पक्षातर्फे पंच साक्षीदार चंद्रकांत रविंद्र इथापे यांचा सरतपास जिल्हा सरकारी वकील देवेंद्रसिंह तंवर यांच्यातर्फे नोंदविण्यात आला. दरम्यान, आरोपी क्र. १ ते ४ यांच्यातर्फे नवीन वकील नेमण्याचा अर्ज सादर करण्यात आला, जो न्यायालयाने मंजूर केला.यानंतर, आरोपी गणेश बिवाल यांच्यातर्फे विधिज्ञ तुकाराम मासुळे यांनी साक्षीदाराची दोन तास उलटतपासणी घेतली. मात्र, न्यायालयीन वेळ संपल्याने साक्ष अपूर्ण राहिली आणि पुढील सुनावणी २४ फेब्रुवारी रोजी होणार आहे. हा खटला मोक्का न्यायालयातील न्यायमूर्ती एस. आर. भदगले यांच्या समोर सुरू आहे. सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील देवेंद्रसिंह तंवर हे कामकाज पाहत आहेत.



मयत गुड्ड्या

### या खटल्याकडे महाराष्ट्राचे लक्ष

गुड्ड्याच्या अत्यंत निर्घुन खूनाच्या घटनेने मोठी खळबळ उडवली होती. विशेष म्हणजे, या हत्येचे सीसीटीव्ही फुटेज संपूर्ण भारतात व्हायरल झाले होते, त्यामुळे या खटल्याचा निकाल काय लागतो याकडे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.